# विविध लेख व भाषणे

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**विविध लेख व भाषणे**
लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३७०/-

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | दुष्काळी परिस्थिती........................................ | ७ |
| २. | फॅमिन रिलीफ कोड........................................ | १० |
| ३. | दुष्काळी परिस्थिती........................................ | १२ |
| ४. | दुष्काळ आणि सरकार .................................... | १४ |
| ५. | ज्योति:शास्त्रावरील नवा ग्रंथ.............................. | १६ |
| ६. | बडोद्याचा खाना ............................................ | १८ |
| ७. | कलकत्त्याची राष्ट्रीय सभा.................................. | २० |
| ८. | स्वामी विवेकानंद.......................................... | २५ |
| ९. | युरोपियन लोकांचा राजद्रोह................................ | २९ |
| १०. | आमची देवस्थाने........................................... | ३३ |
| ११. | प्लेग....................................................... | ३८ |
| १२. | प्लेगसंबंधी सूचना .......................................... | ४१ |
| १३. | इनॉक्युलेशनसंबंधी........................................ | ४६ |
| १४. | गणपतीउत्सवाविषयी....................................... | ४९ |
| १५. | नवीन म्युनिसिपल बिल.................................... | ५२ |
| १६. | नवीन म्युनिसिपल बिलाचे पहिले वाचन.................... | ५६ |
| १७. | म्युनिसिपल बिल ........................................... | ६३ |
| १८. | प्रो. मॅक्समुल्लर यांचा समाजिष्टांस उपदेश......................................... | ६८ |
| १९. | सँढर्स्ट यांचे स्मारक....................................... | ७५ |
| २०. | पंडिता रमाबाईंची दुसरी मोहीम.............................. | ७८ |
| २१. | पंधरावी राष्ट्रीय सभा....................................... | ८२ |
| २२. | लॉर्ड सँढर्स्ट यांच्या स्मारक चळवळीविषयी ................ | ८७ |
| २३. | लॉर्ड सँढर्स्ट यांचे स्मारक चळवळीविषयी................... | ८८ |

२४. लॉर्ड सँढर्स्ट यांचे स्मारक ................................ ९०
२५. दुष्काळ निवारण, नवीन धंदे
आणि पोटापाण्याची सोय.................................. ९२
२६. श्री शिवजयंत्युत्सव ......................................... ९६
२७. व्यापारी शिक्षणाची शाळा.................................. १००
२८. धर्मांतर .................................................... १०६
२९. डॉ. भाटवडेकर............................................ १०८
३०. इनामदारांची दैना.......................................... १११
३१. धंदेशिक्षणाची अडचण .................................... ११६
३२. सार्वजनिक सभेबद्दल तिच्या हितशत्रूंची ओरड ............ १२१
३३. हिंदुस्थानातील दारिद्र्य .................................... १२९
३४. हिंदुस्थानावर लादलेला लष्करी खर्च....................... १३२
३५. येता राज्यारोहणोत्सव....................................... १३६
३६. राज्यारोहण समारंभ......................................... १४१
३७. सुशिक्षितांसंबंधी ........................................... १४८
३८. दिल्ली दरबाराविषयी....................................... १५०
३९. धारवाड प्रांतिक सामाजिक सभा .......................... १५३
४०. धारवाड सामाजिक परिषद ................................ १५५
४१. रा. ब. वामनराव कोल्हटकर .............................. १५७
४२. पुनर्विवाह.................................................. १५९
४३. लॉर्ड कर्झनसाहेबांचे युनिव्हर्सिटी बिल...................... १६०
४४. हिंदुस्थानचे राज्य कसे असावे............................. १६२
४५. सेंट्रल हिंदू कॉलेज व त्यावरील आक्षेप.................... १६९
४६. लॉर्ड कर्झन यांस मानपत्र .................................. १७५
४७. हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिती
आणि ती सुधारण्याचे उपाय................................ १८१
४८. राष्ट्रीय सभा................................................ १८७
४९. टिळकांना पानसुपारी
'लोकमान्य' शब्दाचा उल्लेख.............................. १९०

५०. बालविवाहासंबंधी........................................... १९२
५१. हिंदुस्थानवर रशियाची स्वारी................................ १९४
५२. त्रावणकोरची श्रीमूलं लोकसभा............................. २००
५३. मुंबई येथील विसावी राष्ट्रीय सभा........................... २०७
५४. राष्ट्रीय नीतिमत्ता आणि बादशाही अरेरावी .................. २१३
५५. रशियातील दंगा ............................................ २१९
५६. देशी संस्थाने व त्यांची सैन्ये................................. २२५
५७. अस्पृश्यताविषयक.......................................... २३२
५८. कोल्हापूरचे राजोपाध्ये ...................................... २३४
५९. दोन बड्या अधिकाऱ्यांची लढाई........................... २३६
६०. सर जेम्स मॉंटीथ........................................... २४३
६१. स्वदेशी चळवळीवर आक्षेप................................. २४६
६२. ही वेळ आज नाही तर
उद्या यावयाची होती!...................................... २४८
६३. हे काम तुमच्या शक्तीबाहेचे नाही.......................... २५५
६४. राष्ट्रीय सभा व स्वदेशी चळवळ ............................ २६२
६५. प्रो. गोखले यांचे अभिनंदन................................. २६७
६६. 'स्वदेशी'चे स्वयंसेवक ..................................... २७०
६७. काशी क्षेत्रातील स्वदेशी चळवळ........................... २७६
६८. एकवीसाव्या राष्ट्रीय सभेने काय केले?...................... २८४
६९. आमचेच-पण कळेल तेव्हा-१............................. २९०
७०. आमचेच-पण कळेल तेव्हा-२............................. २९६

✦✦✦

# १. दुष्काळी परिस्थिती

आला आला म्हणता म्हणता दुष्काळ निखालस चोहोकडे पडू लागला आहे. इतकेच नव्हे तर पाऊस पडून त्याची तीव्रता कमी होण्याची आता बहुतेक आशा राहिली नाही. दिवाळीपर्यंत पावसाची थोडीबहुत आशा आहे पण ती सफल होण्याची फारशी चिन्हे दिसून येत नाहीत. मुंबईच्या कायदेकौन्सिलात पाच-सहा लोकनियुक्त सभासदांनी विचारिलेल्या पश्नास उत्तरादाखल म्हणून जी माहिती मुंबई सरकारने दिली होती ती गेल्या अंकी प्रसिद्ध केलीच आहे. त्यानंतर कलकत्याच्या कौन्सिलात आ. मि. वुडबर्न व खुद्द व्हाइसरायसाहेब यांनी गेल्या गुरुवारी जी हकीकत सांगितली त्यावरून यंदाचा दुष्काळ फारच भयंकर असून तो सर्व हिंदुस्थानच्या बहुतेक प्रांतात पडर याबद्दल संशय राहात नाही. आनरे. वुडबर्न साहेबांनी जी माहिती दिली त्यात रब्बीच्या पिकसंबंधाने काही सांगितलेले नाही. दिवाळीपर्यंत पाऊस पडल्यास ही पिके अद्याप थोड्याबहुत प्रमाणाने तरी होतील, परंतु तो पाऊस पडला नाही तर अयोध्या, आग्रा, अलाहाबाद, बनारस, गोरखपूर, रोहिलखंड, सतलजच्या पलीकडील पंजाबचा भाग, लाहोरच्या आसपासचा काही प्रदेश, मध्य प्रांतातील सागर, नरसिंगपूर, हुशंगाबाद हे जिल्हे व ब्रह्मदेशचा उत्तर भाग इतक्या प्रदेशात सन १८७७-७८ सालाप्रमाणे भयंकर दुष्काळ होईल. हिंदुस्थान सरकारास जी माहिती मिळाली आहे त्यावरून मुंबई इलाख्याची स्थिती भयंकर नाही. कारण या इलाख्यात पिके अजिबात बुडाली नाहीत. तथापि धान्याचे भाव दिढी-दुपट्टीने वाढले असल्यामुळे व आगगाडीच्या सोयीने चोहोकडे दर सारखेच वाढतात किंवा कमी होतात यामुळे मुंबई इलाख्यातील लोकांसही दुष्काळ चांगला जाणवल्याखेरीज रहावयाचा नाही असे आ. वुडबर्नसाहेबांनी बोलून दाखविले व हे म्हणणे बरोबर आहे असे व्हाइसरायसाहेबांनी आपल्या भाषणात सांगितले. सारांश, सन १८७७-७८ सालाप्रमाणे यंदाही भयंकर दुष्काळ पडणार हे आता बहुतेक ठाम झाले आहे. मध्य प्रांतात तर मनुष्ये दुष्काळाने मरावयास लागली आहेत असे समजते. अशा वेळी सरकार काय करण्यास तयार आहे, अथवा त्यांनी काय केले पाहिजे व लोकांनी काय

केले पाहिजे याचा थोडासा विचार करणे जरूर आहे व तो विशेषत: मुंबई इलाख्यासंबंधानेच करण्याचा आमचा विचार आहे.

✦

वुडबर्नसाहेबांनी आपल्या भाषणात सन १८७७-७८ व सन १८९६-९७ या दोन सालच्या दुष्काळासंबंधाने जो मोठा फरक दाखविला आहे तो हा होय की १८९६ मध्ये रेल्वे, कालवे वगैरे ठिकठिकाणी धान्य पोहोचविण्याची अथवा शेतकी करण्याची जितकी साधने उपलब्ध आहेत तितकी १८७७-७८ साली नव्हती. वुडबर्न साहेबांचे हे म्हणणे खरे आहे; पण ते बहुतेक पंजाब, औंध व वायव्येकडील प्रांत यासच लागू आहे असे म्हटले तरी चालेल. आमच्या मुंबई इलाख्यात (सिंध प्रांत सोडून दिला तर) कालव्याखाली भिजणारी जमीन फारच थोडा आहे. सन १८७७-७८ सालानंतर दौंड-मनमाड व सदर्न मराठा आणि काठेवाडातील रेल्वे झाल्या आहेत. यांपैकी दुष्काळास खरोखर उपयोगी म्हणजे नगर जिल्ह्यातील रेल्वे आहे असे म्हटले तरी चालेल. कारण कर्नाटकात व काठेवाडात पिके उत्तम नसली तरी सामान्यत: बरी आहेत. सदर्न मराठा रेल्वेने उलट धारवाड बेळगावकडे मात्र धारण महाग होत चालली आहे. जेथे जेथे रेल्वे झाली तेथे तेथे एक तर पूर्वीप्रमाणे धान्याचा साठा राहात नाही; व दुष्काळाचे वेळी तेथून इतर ठिकाणी धान्य नेण्याची सोय झाल्यामुळे तेथे धान्य पिकले असल्यास ते दुसरीकडे जाऊन चोहोकडे दुष्काळाचीच धारणा होते. अशा दृष्टीने पाहिले म्हणजे रेल्वेपासून काही भागास नफा व काही भागास तोटा अथवा दुसऱ्या भाषेने लिहावयाचे असल्यास सर्व ठिकाणी सारखीच सवंगाई किंवा महागाई होत असते व तसाच प्रकार यंदा मुंबई इलाख्याचा झाला आहे. मुंबई इलाख्यात पिकलेले धान्य मुंबई इलाख्यातील लोकांस पुरण्याइतके आहे असा अंदाज आहे; पण नागपूर, आग्रा, लाहोर वगैरे ठिकाणी भराभर धान्य जाऊ लागल्यामुळे आमच्याकडे गरीब लोकांचे मोठे हाल होत चालले आहेत. किंबहुना पंजाबाइतका भयंकर दुष्काळ येथेही पडणार की काय अशी सर्वांस धास्ती वाटत आहे. अशा स्थितीत सरकारचे पहिले कर्तव्य म्हटले म्हणजे देशात धान्याचा पुरवठा चांगला करणे हे होय. मग तो हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानात होत नसल्यास परदेशातून धान्य आणून केला पाहिजे. आमचे गहू दरसाल खंडोगणती विलायतेस जातात त्याऐवजी यंदा इतर देशातील गहू येथे आला पाहिजे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया देशातून हिंदुस्थानात येण्याकरिता गव्हाची तीन गलबते निघाली असून तो गहू कलकत्त्यास दहा शेर व अलाहाबादेस साडेनऊ शेर विकता येईल असे वुडबर्नसाहेबांचे म्हणणे आहे. एकंदर

हिंदुस्थानात चाळीस-पन्नास लाख पल्ले धान्य लागेल व ते वर्षभर पंचवीस लाख माणसांना पुरेल असा फॅमिन कमिशनचा अंदाज वुडबर्नसाहेबांनी दिला आहे, पण हा अंदाज फारच कमी आहे असे आम्हास वाटते. कसेही असो; अमेरिका, रशिया वगैरे प्रांतातून येथे धान्य आणून टाकणे हे काम देशी व्यापाऱ्यांच्या हातून पार पडणार नाही. करिता बाहेरच्या देशांतून मुबलक धान्य आणून धान्याचे भाव दिढीदुपटी चढले आहेत ते कमी करणे हे सरकारचे पहिले कर्तव्य आहे, असे आम्ही समजतो. देशात धान्य एकदा मुबलक झाले म्हणजे ते घेण्यास लोकांस पैसे कसे मिळावे येवढाच प्रश्न राहतो. पण ज्यांच्याजवळ पैसे आहेत त्यांची तरी हलाखी नाहीशी होऊन लोकांचे दु:ख निवारण करण्याचे कामास लागण्यास सवड सापडते.

-स्फुट, २० ऑक्टोबर १८९६

✦✦✦

# २. फॅमिन रिलीफ कोड

फॅमिन रिलीफ कोडाप्रमाणे सरकारने ज्या गोष्टी कराव्या असे ठरलेले आहे त्यांची ही याद झाली. दुष्काळ पडला असता काय करावे लागते याचा आजपर्यंतच्या दुष्काळांवरून अनुभव पाहून सरकारने वर लिहिलेल्या गोष्टी कायम केलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर या प्रत्येक बाबतीत बारीक-सारीक अडचणी काय येतात त्या सर्वांचा विचार होऊन त्या फॅमिन रिलीफ कोडात दाखल केल्या आहेत. या कोडांची सुमारे २०० कलमे असून त्याचे १५, १६ भाग आहेत व त्यात बहुतेक कोणतीही गोष्ट सुटलेली नाही. रिलीफच्या कामावर रोज मजुरांना किती पैसे द्यावे येथपासून तो धर्मार्थ गृहांत पोरकी पोरे शिल्लक राहिली असता त्यांची काय व्यवस्था करावी अथवा हजेरीपत्रके कशी भरावी याबद्दल सर्व बारीक-सारीक माहिती या कोडात दिली आहे. सरकारला या गोष्टी समजत नाहीत अशी जर कोणाची समजूत असेल तर ती अगदी चुकीची आहे. ज्याप्रमाणे दिवाणी अगर फौजदारी कायद्यात आता अगदी बारीक सारीकसुद्धा माहिती दिलेली असते त्याप्रमाणे फॅमिन फिलीफ कोडाचीही स्थिती आहे. कलेक्टरने आठवड्यास अमक्या तऱ्हेचे रिपोर्ट सरकारकडे पाठवावे हेही त्यात सांगितलेले आहे! पंचाईत काय ती एवढीच की, या फॅमिन रिलीफ कोडाची अंमलबजावणी व्हावी तशी होत नाही. सरकारने दर मजुरास रोज शेर किंवा निदान पाऊण शेर तरी धान्य मिळावे असे ठरविले आहे; पण सर रिचर्ड टेंपलसारखे गव्हर्नर असले म्हणजे धड अर्धा शेरही मजुरांच्या पोटात पडू देत नाहीत. धर्मार्थ अन्न वाटण्याची गृहे स्थापन करावी असे फॅमिन रिलीफ कोडात आहे; पण आमचे कलेक्टर असे खमंग आहेत की यांस आपले जिल्ह्यांत असली गृहे स्थापण्याची आवश्यकताच कधी भासत नाही! ज्या गावची पिके अजिबात बुडाली असतील तेथे दुष्काळाच्या साली सारा वसूल करू नये अशी शिफारस करण्याचा अधिकार या कोडाप्रमाणे कलेक्टरसाहेबांस दिलेला आहे; पण रयतेस सरकारी नियम चांगले माहीत नसल्यामुळे त्यास सदर नियमांचा घेता यावा तितका फायदा घेता येत नाही. त्यांची गुरे मेली तरी ते जंगलात सोडून देण्यास धजत नाहीत. अथवा जंगलातून सरपणाकरिता अगर इमारतीच्या उपयोगाकरिता लाकडे आणीत नाहीत. काही काही ठिकाणी तर सरकारी